# नोटीस

जा क्र. मनको/ प्रशासन / ११५७ /२०१९-२० दिनांक २७/०९/२०१९

प्रति,

सन्माननिय सभासद,

विषय- बँकेच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुक प्रक्रियेत मतदानाचा हक्क बजावणेसाठी क्रियाशिल सभासद होण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना . . .

आपणांस या पत्रान्वये कळविण्यात येते की, जीएस महानगर को-ऑप.बँक लि.,मुख्य कार्यालय हिरामणी सुपर मार्केट, डॉ.बी.ए.रोड, लालबाग, मुंबई ४०००१२ ही बँक दि महाराष्ट्र को-ऑप.सोसायाटी अॅक्ट १९६० अन्वये नोंदणीकृत सहकारी संस्था असून बँकेचा कारभार कायदा, कानून व बँकेच्या पोटनियमानुसार चालतो.

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी करावयाच्या कार्यवाही संदर्भात पत्रव्यवहार केलेला असुन सहकारी संस्था अधिनियम १९६१ कायदा १९६० व सुधारीत पोटनियमातील तरतुदीनुसार सभासदांना त्यांचा मतदानाचा हक्क बजावण्यासाठी क्रियाशिल व अक्रियाशिल सभासदांच्या व्याख्येबाबत सर्व सभासदांना अवगत व ज्ञात करणे गरजेचे आहे.

सर्व सभासदांना सुचित करण्यात येते की बँकेच्या क्रियाशिल सभासद होण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे -

१. निवडणूक कालावधी संपलेल्या दिवसाच्या (दिनांक ०४/०३/२०२०) दोन वर्ष अगोदर म्हणजे दिनांक ०३/०३/२०१८ रोजी पटलावर असलेले सभासद मतदानासाठीच्या प्राथमिक यादीमध्ये सामाविष्ट असतील.
२. आपल्या बँकेच्या भागभांडवल मर्यादेनुसार बँकेचे क्रियाशील सभासदांसाठी कमीतकमी भागभांडवल मर्यादा रू.१,५००/- इतकी असुन बँकेशी सभासदांनी करावयाच्या व्यवहाराबाबत सर्व प्रकारच्या ठेव खात्यांची एकत्रीत रक्कम पोटनियमातील तरतूदीनुसार रू.७,०००/- किंवा कर्ज स्वरुपात रू.१,००,०००/- पर्यंतचे कर्जव्यवहार करणे आवश्यक आहे.
३. प्रोप्रायटरी/भागीदारी संस्था/प्रायव्हेट लि.कंपनी/ट्रस्ट यांचेकडून ठराव प्राप्त करून घेण्यासाठी संस्थेच्या नावाचा ठराव व मतदानाबाबतचे अधिकार दिलेल्या व्यक्तीची माहिती बँकेस देणे.
४. सभासदांनी मागील पाच वर्षात एकदातरी वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थिती दिलेली असावी. याबाबत प्रत्येक वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सभासदांची अनुपस्थिती क्षमापित केलेली आहे.
५. बँकेच्या थकबाकीदार सभासदांसाठी कायदा कलम ७३ क (अ) नुसार कोणत्याही प्रकारच्या कर्ज खात्यावर थकबाकी (Any Installment Due) असल्यास सदर सभासद क्रियाशील होण्यास अपात्र राहील. यासाठी दि.३१.१०.२०१९ रोजी आपल्या कोणत्याही प्रकारच्या कर्ज खात्यावरील संपुर्ण थकबाकी भरणे आवश्यक आहे.
६. सर्व सभासदांनी आपल्या राहण्याच्या पत्यामध्ये बदल झालेला असल्यास नजीकच्या शाखेस कळविण्यात यावे तसेच आपल्या बचत /चालू खात्याची केवायसी पूर्तता (दोन फोटो,पॅन कार्ड, पासपोर्ट, आधार कार्डच्या इ. प्रती सादर करुन) करुन घेण्यात यावी. तसेच सभासदांनी आपले मोबाईल क्रमांक व ईमेल पत्ते सादर करावेत.
७. संचालक मंडळाच्या निवडणूकीमध्ये फक्त क्रियाशील सभासदानांच मतदानाचा हक्क प्राप्त होणार आहे.त्यानुसार क्रियाशील सभासद होण्यासाठी वरील पूर्तता करणे आवश्यक आहे.

तरी आपणास विनंती करण्यात येत आहे की, वरील सूचनांचे पालन करुन आपण क्रियाशिल सभासद असल्याबाबतची माहिती मा. निवडणुक अधिकारी यांचे कार्यालयात देण्यासाठी दि.३१.१०.२०१९ पुर्वी वरील सर्व सूचनांची कार्यपुर्तता करुन निवडणुक प्रक्रिया सुरळीत पार पडण्यासाठी बँकेस सहकार्य करावे.

कळावे.

sd/, कार्यकारी संचालक
जीएस महानगर को.ऑप.बँक लि.मुंबई